1 8 MAY 2026 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुलगुरू निवडीकडे शैक्षणिक वर्तुळाचे लक्ष

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या नव्या पूर्णवेळ कुलगुरूंचा शोध आता अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. कुलगुरू निवड शोध समितीने शिफारस केलेल्या पात्र पाच अंतिम उमेदवारांच्या मुलाखती झाल्या. आता नव्या कुलगुरूंच्या नावाची अधिकृत घोषणा होण्याची शक्यता असल्याने संपूर्ण शैक्षणिक वर्तुळात उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू डी. टी. शिर्के यांचा कार्यकाळ दि. ६ ऑक्टोबर, २०२५ रोजी पूर्ण झाल्यानंतर हे पद रिक्त झाले. तेव्हापासून विद्यापीठाचा अतिरिक्त कार्यभार



सावित्रीबाई फुले-पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्याकडे सोपवण्यात आला होता. कुलगुरुपदासाठी एकूण ११५ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. फेब्रुवारी महिन्यात या अर्जांची छाननी करून शोध समितीने सुरुवातीला २८ उमेदवारांची नावे मुलाखतीसाठी पात्र ठरवली होती. त्यानंतर मुंबईत ३ आणि ४ एप्रिल रोजी झालेल्या पहिल्या टप्प्यातील मुलाखतींमधून अंतिम पाच जणांची यादी कुलपती कार्यालयाकडे सादर करण्यात आली होती.

या अंतिम पाच दावेदारांमध्ये मुंबईतील डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत, शिवाजी विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, नागपूर येथील डॉ. स्मिता देशमुख आणि पुणे विद्यापीठाचे डॉ. संजय ढोले या दिग्गजांचा समावेश आहे. या सर्वांच्या मुलाखती पूर्ण झाल्या असून, कुलपती कार्यालयाकडून लवकरच यातील एका नावावर अंतिम शिक्कामोर्तब केले जाण्याची शक्यता आहे.